**नियमित दिवाणी दावा क्र.७४/२०१७**

**आनंदा विरुध्द संपत**

**CNR:MHSN14-000318-2017**

## नि.क्र. ५८ वरील आदेश

प्रतिवादी नं. ६ ने सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द दि. १९/३/२०१८ रोजी दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्ज वाचला. दोन्ही विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. वादीने प्रतिवादींच्या विरुध्द दावा मिळकतीचा कब्जा मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. अर्जामध्ये प्रतिवादी नं. ६ याने त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे ही उच्च न्यायालयातील विधीज्ञांकडून वेळेत परत न मिळाल्याने तसेच कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे लॉक डाऊन असल्यामुळे संबंधीत वकीलांशी संपर्क साधणे शक्य झाले नसल्याने प्रतिवादी नं. ६ यांना कैफियत व म्हणणे वेळेत देता आले नाही असे कारण नमूद केलेले आहे. अर्जातील नमूद कारणांचा विचार करता व प्रतिवादी नं. ६ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब यांचा कालावधी अर्जावर आदेश करण्यापूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे. प्रतिवादी नं. ६ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायदानास मदत होणार आहे. म्हणून प्रतिवादी नं. ६ चा अर्ज तालुका विधी सेवा समिती यांच्याकडे खर्च म्हणून र.रु. ७००/- भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यास येतो.

HARIDAS SANDIPAN SATPUTE
Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2022.02.16 17:31:16 +0530

शिराळा **(एच. एस. सातपुते)**

दिनांक १६/०२/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, शिराळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 16/02/2022 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 16/02/2022 |
| Judgment uploaded on | : | 16/02/2022 |